**महाराष्ट्र शासन**
ग्रामविकास विभाग,
बांधकाम भवन,25, मर्झबान पथ,फोर्ट, मुंबई-400 001.

Email ID: itcell-rdd@mah.gov.in Computer no : 928163
File No.: प्रणाली 5624/ प्र क्र 56/मातंक दिनांक :- Date of Digital Signature.

---

**प्रति,**
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, (सर्व).

**विषय :-** Single Unified Portal या प्रणालीच्या वापराबाबत
**संदर्भ :-** शासनाचे समक्रमांकाचे दि.4 एप्रिल,2025 व दि.4 नोव्हेंबर,2025 रोजीचे पत्र.

महोदय/ महोदया,

या विभागामार्फत राबविल्या जाणाऱ्या योजनांची प्रभावी अंमलबजावणी करणे, कामकाजात गतिमानता व पारदर्शकता आणणे विविध योजनांद्वारे करण्यात येणाऱ्या कामाची द्विरुक्ती टाळणे निधी वितरणाचे संनियंत्रण करणे,कामात एकसुत्रता आणणे तसेच सेवेची गणुवत्ता वाढविणे या दृष्टीने विभागात Single Unified Portal हा माहिती तंत्रज्ञान आधारीत प्लॅटफॉर्म विकसीत करण्यात आला आहे.

Single Unified Portal ही प्रणाली या विभागांतर्गत 2515- इतर ग्रामीण विकास कार्यक्रम, 3054- रस्ते व पुल अंतर्गत कामे व इतर कामे यांची मान्यता व निधी वितरण यांसाठी दि. 1 एप्रिल,2024 पासून लागु करण्यात आली आहे. संदर्भांकित दि. 4 नोव्हेंबर,2025 च्या शासन पत्रान्वये SUP प्रणालीचा वापर सुलभपणे करता यावा याकरिता वापरकर्ता पुस्तिका (User Manual) सर्व जिल्हा परिषदांना पाठविण्यात आली होती. तसेच यासंदर्भात बँक ऑफ महाराष्ट्र यांचे मार्फत प्रशिक्षण देण्यात येणार असल्याचे ही कळविण्यात आले होते. तथापि, बराच कालावधी उलटून देखील अद्याप सर्व जिल्हा परिषदांचे प्रशिक्षण पूर्ण न झाल्याचे निदर्शनास आले आहे. त्यानुसार बँक ऑफ महाराष्ट्र यांच्या प्रतिनिधींकडुन आपल्या अधिनस्त संबंधित अधिकारी/ कर्मचारी यांचे प्रशिक्षण दि.28 फेब्रुवारी,2026 पर्यंत कोणत्याही परिस्थितीत पूर्ण होईल याची कृपया दक्षता घ्यावी. तसेच दि.1 मार्च,2026 पासून उपरोक्त योजनांचे मान्यता व निधी वितरणाचे पूर्ण कामकाज केवळ Single Unified Portal वरच केले जाईल याची नोंद घ्यावी व त्यानुसार आवश्यक ती कार्यवाही करावी.

या संदर्भात प्रधान सचिव (ग्रामविकास) हे आढावा घेणार असल्यानेSUP प्रणाली पूर्णत: कार्यान्वित करण्याची कृपया प्राधान्याने कार्यवाही करावी.

आपला,

Digitally signed by
PRASHANT VINAYAKRAO PATIL
Date: 17-02-2026 18:55:56

(प्रशांत पाटील)
**उप सचिव,महाराष्ट्र शासन**

**प्रत:-**

1. उप सचिव( योजना-6 व बांध-3), ग्रामविकास विभाग, बांधकाम भवन मुंबई
2. व्यवस्थापकीय संचालक,बँक ऑफ महाराष्ट्र ,हेड ऑफीस 1501,लोकमंगल, शिवाजीनगर,पुणे 411005
3. निवडनस्ती (मातंक ),ग्रामविकास विभाग मंत्रालय,मुंबई.